**नि.फौ.ख.क्र.३०/२०२३**
**निशाणी १७**

**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०१ यांची जबानी**

मी याव्दारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

माझे नाव – नरेंद्र वासुदेव रांजणकर
वय सुमारे – ३५ वर्षे, व्यवसाय–मासेमारी
निवासस्थान–निवती मेढा, ता. वेंगुर्ला, जिल्हा– सिंधुदुर्ग.

**सरतपास सहायक सरकारी वकील श्रीमती ए.ए.पवार यांच्या मार्फत सुरु–**

०१. दिनांक १५/०४/२०२३ रोजी पोलीसांनी मला पंचनामा करण्याकरीता बोलविले नव्हते. (साक्षीदाराला दि. १५/०४/२०२३ रोजीचा घटनास्थळ व जप्ती पंचनामा दाखविण्यात आला.) सदर पंचनाम्यामधील मजकूर मला माहीत नाही. त्यावर अनु.क्र.१ वरील सही माझी आहे. (सहीस **निशाणी– पी–१/पीडब्ल्यू१** देण्यात येते.) **(सदर कागदातील मजकूर शाबीत करण्याची जबाबदारी अभियोगपक्षावर राहील.)**

**सदर साक्षीदार सरकारी पक्षास सहाय्य करीत नसलेने त्यास सरकारी वकीलांनी उत्तरसुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागीतली ती त्यांना देण्यात आली.**

०२. हे म्हणणे खरे आहे की, दि. १५/०४/२०२३ रोजी माझ्यासोबत दुसरे पंच शिवानी सावंत या घटनास्थळी उपस्थित होत्या. हे म्हणणे खरे आहे की घटनास्थळ पूनम गोलतकर यांनी दाखविले होते. हे म्हणणे खरे नाही की सदरचे घटनास्थळ हे ग्रामपंचायत घर क्र.४५ च्या अंगणात तुळशी वृंदावनच्या बाजूला आहे. हे म्हणणे खरे नाही की पोलीसांनी माझ्यासमक्ष लाकडी दांडा जप्त केला. हे म्हणणे खरे नाही की त्यावेळी पोलीसांनी सदरचा पंचनामा मला वाचून दाखविला व त्यातील मजकूर खरा व बरोबर असल्याची खात्री झाल्यावर त्यावर आम्ही सही केली. हे म्हणणे खरे नाही की मी आरोपीला वाचविण्यासाठी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**सरतपास पूर्ण.**

**<u>उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री.एस.आर.ओगले यांचेमार्फत नाकारला.</u>**

श्रवणोत्तर स्विकृत,

सही/–

दिनांक– १७/०९/२०२५

(एस.जे.चिवटे)
न्यायदंडाधिकारी वर्ग १, वेंगुर्ला.